# जिल्हा व सत्र न्यायालय, भंडारा

## निविदा सूचना

क्रमांक/संगणक/१४०९ /२०२५. दिनांक: १० /०४/२०२५

मानननीय प्रमूख जिल्हा व सत्र न्यायाधीश, भंडारा यांचे दिनांक १०/०४/२०२५ चे आदेशान्वये जिल्हा न्यायालय, भंडारा व अधिनस्थ न्यायालय येथील खालील नमूद एकूण ११४ प्रिंटर चा **एक वर्षाकरिता** सर्वसमावेषक वार्षिक देखभाल व दुरूस्ती करार Comprehensive Annual Maintenance Contract करण्याकरिता निविदा मागविण्यात येत आहेत. करिता इच्छूक कंपनी/अभियंता यांनी प्रपत्र क्रमांक १ तसेच नमूद अटी व शर्तीसह सिलबंद निविदा दिनांक १९/०४/२०२५ ला सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत जिल्हा न्यायालय, भंडारा येथे सादर करावे.

तद्नंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

## प्रपत्र क्रमांक १

| Sr. No. | Court Name | Printer Name/Model and Quantity | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Canon LBP 151 dw | HP Laser Jet M202 dw | HP Laser Jet P1606dn | HP Laser Jet P1566 | HP Laser Jet P1008/ P1006 | HP Laser Jet P1022 | Kyocera m2040dn |
| 1 | District Court, Bhandara | 25 | 8 | 6 | 5 | 4 | 2 | 15 |
| 2 | Civil and Criminal Court, Tumsar | 2 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 03 |
| 3 | Civil and Criminal Court, Mohadi | 3 | 0 | 0 | 0 | 2 | 0 | 02 |
| 4 | Civil and Criminal Court, Pauni | 8 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 04 |
| 5 | Civil and Criminal Court, Sakoli | 8 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 02 |
| 6 | Civil and Criminal Court, Lakhani | 1 | 0 | 2 | 2 | 0 | 0 | 02 |
| 7 | Civil and Criminal Court, Lakhandur | 2 | 2 | 0 | 1 | 0 | 0 | 02 |
| **Total Quantity (Model wise)** | | **49** | **11** | **08** | **08** | **06** | **02** | **30** |
| **Printers Total Quantity** | | **114** | | | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Comprehensive Annual Maintenance Contract Rate Per Unit (Model wise) in Rupees. (Including GST) | | | | | | | |
| Comprehensive Annual Maintenance Contract Rate in Rupees. (Including GST) **(i.e. Modelwise total Quantity X Contract Rate Per Unit)** | | | | | | | |
| **Total Comprehensive Annual Maintenance Contract Rate in Rupees. (Including GST)** | | | | | | | |

## <u>प्रिंटर देखभाल/दुरूस्तीबाबत अटी व शर्तीः</u>

| | |
|---|---|
| १. | सदर करार जिल्हा न्यायालय, भंडारा व अधिनस्थ तुमसर, मोहाडी, पवनी, साकोली, लाखणी व लाखांदूर या तालूका न्यायालयातील एकूण ११४ प्रिंटर्स करिता राहील. प्रिंटर मध्ये बिघाड आल्यास ते दुरूस्तीकरिता संबंधित कंपनी/निविदाधारक यांना प्रिंटर ज्या न्यायालयात आहे त्या न्यायालयात स्वतः जावून प्रिंटर दुरूस्ती करावा लागेल. |
| २. | सदर करार सर्वसमावेषक पध्दतीचा राहील. प्रिंटर व त्याच्याशी संबंधित सर्व सुटे भाग दुरूस्ती किंवा ते नवीन लावावयाचे असल्यास नवीन खरेदी करणे संबंधित कंपनी/निविदाधारक यांचेवर बंधनकारक राहील. सुटे भाग उच्च दर्जाचे असणे बंधनकारक राहील. |
| ३. | निविदेमध्ये नमूद करण्यात आलेले दर सर्व कर आणि इतर शुल्कासहित आहेत असे गृहीत धरण्यात येईल. |
| ४. | कंपनी रूपये ५०,०००/- अक्षरी रूपये पन्नास हजार फक्त किंमतीपेक्षा जास्त च्या वार्षिक देखभाल करार व्यापारात ०१ वर्षापेक्षा जास्त काळ अस्तित्वात असायला हवी. |
| ५. | निविदा सादर करताना त्यासह कंपनीचा नोंदणी प्रमाणपत्र, पॅन कार्ड, जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र, आयकर प्रमाणपत्र (मागील ०१ वर्षाचे), नजीकच्या काळात संगणक, प्रिंटर, स्कॅनर किंवा इतर संगणकीय उपकरणे/हार्डवेअरशी संबंधित शासकीय/निमशासकीय कार्यालये यांचेसोबत करार केलेल्या वार्षिक देखभाल/दुरूस्ती (कमीत कमी ०१) इ. कागदपत्रांच्या स्वयंःप्रमाणित छायाप्रत सादर करणे बंधनकारक राहील. |
| ६. | करार झाल्यावर कंपनी/निविदाधारकास तक्रार दाखल करण्याकरिता एक ई-मेल आयडी व एक मोबाईल/दूरध्वनी क्रमांक देणे बंधनकारक राहील. ज्यावर जिल्हा न्यायालय, भंडारा व तालूका न्यायालयातील संबंधित कर्मचारी यांचेद्वारे तक्रार नोंदविले जातील. |
| ७. | प्रिंटर दुरूस्तीकरिता ई-मेल किंवा मोबाईल/दूरध्वनी संदेशाद्वारे तक्रार दाखल केली असता कंपनी/निविदाधारक यांना जिल्हा न्यायालय, भंडारा येथील तक्रार २४ तासाचे आत व तालूका न्यायालयातील तक्रार ४८ तासाचे आत दुरूस्ती करून द्यावी लागेल. असामान्य परिस्थितीत प्रपत्र क्रमांक १ मधील कोणतेही प्रिंटर दुरूस्ती होत नसल्यास किंवा त्याचे सुटे भाग उपलब्ध होत नसल्यास त्याचे वैध कारण सर्व्हीस रिपोर्ट मध्ये नमूद करणे बंधनकारक राहील. वैध कारण लक्षात घेऊन अशा दुरूस्तीकरिता जास्तीत जास्त एक आठवडा इतका कालावधी देण्यात येईल. परंतु कार्यालयास दैनंदिन कामकाजात अडचण निर्माण होऊ नये म्हणून त्याठिकाणी पर्यायी व्यवस्था म्हणून तात्काळ दूसरे प्रिंटर उपलब्ध करून देणे कंपनी/निविदाधारक यांचेवर बंधनकारक राहील. |
| ८. | तक्रार दाखल केलेले प्रिंटर उपरोक्त दिलेल्या कालावधीत दुरूस्ती न केल्यास प्रति दिवस रूपये १००/- अक्षरी शंभर रूपये फक्त (प्रति तक्रार) इतका दंड आकारण्यात येईल व सदरचा दंड संबंधित कंपनी/निविदाधारक यांना देय/प्रलंबित असलेल्या देयकामधून वजा करण्यात येईल. तक्रार दाखल केल्यानंतर सुध्दा प्रिंटर स्तंभ क्रमांक ०७ |

| | |
|---|---|
| | मध्ये दिलेल्या वेळेत दुरूस्ती करून न देल्यास न्यायालय स्थानिक बाजारातून प्रिंटर दुरूस्ती करेल व त्याबाबत येणारा खर्च कंपनी/निविदाधारक यांना देय रकमेतून वजा करण्यात येईल. |
| ९. | निविदा मंजूर झालेल्या कंपनी/निविदाधारक यांना रूपये १००/- अक्षरी शंभर रूपयाचे बॉन्ड पेपरवर आपला करार लिहून द्यावा लागेल व सदरहू बॉन्ड पेपर करिता आलेला खर्च कंपनीला/निविदाधारकास सोसावा लागेल. तसेच अनामत रक्कम म्हणून एकूण रूपये १०,०००/- अक्षरी रूपये दहा हजार फक्त या कार्यालयास जमा करणे बंधनकारक राहील. करार संपल्यानंतर सदरची अनामत रक्कम कंपनी/निविदाधारकास परत करण्यात येईल. |
| १०. | कोणत्याही परिस्थितीत आगाऊ रक्कम दिली जाणार नाही. देयक हे द्विप्रतीत संपूर्ण तपशिलासह या कार्यालयास सादर करावे लागेल. देयक हे त्रैमासिक पध्दतीने त्रैमासिक संपल्यानंतर सादर केल्यावर नियमानूसार अदा करण्यात येईल. नियमांनुसार लागू होणारे कर/शुल्क/दंड कपात करण्यात येईल. |
| ११. | कंपनी/निविदाधारक ०१ वर्षाचा वार्षिक देखभाल/दुरूस्ती कालावधी पूर्ण झाल्यानंतर त्याच दर, अटी आणि शर्तीनुसार वार्षिक देखभाल कराराचा कालावधी वाढविण्यास इच्छूक आहे किंवा नाही हे सूचित करू शकतो. |
| १२. | सदर निविदा सूचनेमधील प्रपत्र क्रमांक ०१ मध्ये नमूद प्रिंटरच्या संख्येत कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही टप्प्यावर, कोणत्याही क्षणी वाढ किंवा कमी अथवा संपूर्णतः वगळण्याचे अधिकार किंवा त्यामध्ये इतर हार्डवेअर समाविष्ट करण्याचा अधिकार माननीय प्रमूख जिल्हा व सत्र न्यायाधीश, भंडारा यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहे. |
| १३. | कोणतीही एक अथवा सर्व निविदा कारण न देता नाकारण्याचा अधिकार माननीय प्रमूख जिल्हा व सत्र न्यायाधीश, भंडारा यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहे. |
| १४. | सदर करार हा मंजूर झालेल्या दिनांकापासून ते पूढील एक वर्षाकरिता वैध राहील. परंतु कार्यालयास वाटल्यास तो कोणत्याही क्षणी, कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार माननीय प्रमूख जिल्हा व सत्र न्यायाधीश, भंडारा यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत. |

**टिप:** १. निविदा सादर करतांना लिफाफ्याच्या पृष्ठभागावर "प्रिंटर दुरूस्तीकरिता सर्वसमावेषक वार्षिक देखभाल व दुरूस्ती बाबतची निविदा" असा स्पष्ट उल्लेख करावा.

२. निविदा उपरोक्त दिलेल्या प्रपत्रातच सादर करावे. त्यात कोणताही बदल करू नये.

३. निविदा सादर करतांना उपरोक्त नमूद अनु क्रमांक १ ते १४ मधील अटी व शर्ती मान्य असल्याचे स्पष्ट नमूद करावे.

४. निविदा सादर करतांना अटी व शर्तीमधील अनु. क्र. ५ मधील आवश्यक कागदपत्रे निविदेसह न चुकता सादर करावे. अन्यथा निविदांचा विचार केला जाणार नाही व त्या रद्द करण्यात येतील.

आदेशान्वये,

१०/११/२५

(एस. एम. निनावे)
प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, भंडारा